PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 4

# ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थांचे शैक्षणिक संपादन व जीवनकौशल्य यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास

**विलास सिताराम वेखंडे**
रिसर्च स्कॉलर
केंद्र प्रमुख, केंद्र. ठाणे ता.शहापूर
जिल्हा ठाणे पिन ४२१४०३
**महाराष्ट्र भारत**

**डॉ. नागराजराव**
मार्गदर्शक
आर.बी.टी. कॉलेज ऑफ
एज्यूकेशन, खंबाळपाडा,
डोबिंवली जिल्हा ठाणे, मुबंई
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना:-

शिक्षणाच्या परिवर्तनामध्ये जीवनाभिमुख शिक्षणाची गरज नेहमीच अधोरेखित केलेली आहे. जीवनातील समस्या, आव्हांनाना तोंड देण्याचे साम्यर्थ व्यक्तीला जीवनाभिमुख शिक्षणातून मिळते. यापूर्वी पाठांतरावर आधारलेल्या शिक्षणपध्दतीवर भर दिल्याने ज्ञानाच्या उपयोजन व आकलन या क्षमताकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे अनेक वर्षे शाळेत शिकूनही मुले आपल्या दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडविण्यास समर्थ बनली नाहीत. त्यांना स्वत:विषयीची जाणीव, जागृती झाली नाही. स्वत:ची बलस्थाने कोणती आहेत याचा कधी शोधच घेतला नाही. इतरांचे दु:ख जाणून घेण्यासाठी त्याठिकाणी आपण आहोत असा दृष्टिकोन तयार झाला नाही. आपल्या पुढील समस्या कशा सोडव्यावात याविषयी विचार झाला नाही. परिणामी ज्ञानाच्या कक्षेवर पाठांतर व माहिती घेणे या उद्दिष्टापुरतेच मर्यादित राहिले.

शैक्षणिक संपादनात केवल गुणांचाच आलेख महत्त्वाचा नसून मुलाच्या गुणात्मकतेचा विचार शिक्षणपध्दतीत सामावला गेला. NCF २००५ मध्ये शैक्षणिक संपादनाच्यादृष्टीने व्यापक विचार माडंला आहे. विदयार्थ्याच्या शारीरिक, मानसिक,

बौध्दिक व आत्मीक अशा क्षमतांच्या संपूर्ण विकासाचा विचार केला आहे. शैक्षणिक संपादनात व्यक्ती आपली शक्ती व क्षमतांचा वापर करुन दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्या सोडविते. व सकारात्मकपणे आपल्या गरजा प्रभावीपणे पूर्ण करते. अशा जीवन पुढे नेणाऱ्या कौशल्याचा विचार केला आहे. म्हणून जागतिक आरोग्य संघटनेने ठरवून दिलेल्या दहा जीवनकौशल्यांचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडयात समावेश केला आहे. दाखल झालेल्या प्रत्येक मुलाची शैक्षणिक संपादणूक चांगली व्हावी अशी सर्वांचीच अपेक्षा असते. परंतु विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर त्याला शिक्षणातून मिळत असलेल्या जीवनकौशल्यांचा त्याच्यावर मोठा प्रभाव पडत असतो. त्यातूनच त्याच्या व्यक्तीमत्त्वाचाही विकास घडत असतो.

**जीवनकौशल्ये :**

जीवनकौशल्ये शिक्षणामध्ये व्यक्ती आपल्या क्षमतांचा सुयोग्य वापर करुन रोजच्या जीवनात येणाऱ्या समस्यांना सकारात्मक रीतीने सोडविते. आणि आपल्या गरजा अधिक प्रभावीपणे पूर्ण करण्यास शिकते. व्यक्तीमध्ये असलेल्या आंतरिक शक्ती व वैशिष्टयांची जाणीव होण्यास मदत होते तसेच दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी व समस्या विचारपूर्वक निर्णय घेवून योग्य मार्ग काढण्यास समर्थ होतो.

विद्यार्थी प्रभावी संवाद साधण्यात सक्षम होतो परिसरातील माहिती, ज्ञान, इतरांचे विचार इ. व्यवस्थितपणे ग्रहण करुन विद्यार्थी त्यानुसार स्वतचे मत बनवितो. आलेल्या परिस्थितीची जाणीव करुन घेवून विद्यार्थ्यामध्ये योग्य निर्णय घेण्याची क्षमता प्राप्त होते. इतरांबद्दलचे द्वेष मत्सर, दूषित विचार न ठेवता त्यांच्याबद्दल आदर, प्रेम, समानानुभूती बाळगून समाजासाठी हितकारक कृती करण्याची वृत्ती विदयार्थ्यांमध्ये तयार होते. इतरांबद्दल दया, प्रेम, आदर सद्भावना बाळगून एकमेकांमधील वैयक्तिक व सामाजिक संबंध निकोप ठेवण्यास विद्यार्थी प्रवृत्त होतो. ताणतणाव विरहित आनंदी जीवन जगण्याची क्षमता निर्माण होते. विदयार्थ्यांमध्ये आपल्या स्वत:च्या सुख:दुखाप्रमाणे इतरांच्या सुखदुखात, प्रसंगात सहभागी होण्याची प्रवृत्ती वाढते.

परिसरात घडलेल्या घटना, कृती अशा प्रकारे घडतात याचा सखोल माहितीच्या आधारे विचार करुन त्यावर तर्क व अनुमान काढून निष्कर्ष काढण्याची क्षमता विदयार्थ्यांमध्ये विकसित होते. एखादी कृती, विचार पारंपारिक रीतीने मांडण्याऐवजी त्यात नाविन्य, सोपेपणा, आनंद निर्माण करुन ते अनुभव वेगळेपणाने विद्यार्थी मांडतात.

**संशोधनाची गरज :**

ठाणे जिल्ह्यातील काही तालुक्यामध्ये जिल्हा परिषद प्रशासनाच्या शाळा आहेत. ग्रामीण दुर्गम व आदिवासी विभागात असलेल्या तालुक्यामध्ये प्रामुख्याने या शाळा आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून शासनाने या तालुक्यांत शैक्षणिक संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळावे यासाठी शासन स्तरावरुन शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. या विविध उपक्रमांचे आयोजन करत असताना संशोधक स्वत: या उपक्रमामध्ये प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष सहभागी आहेत. हे सर्व उपक्रम जरी शाळांमध्ये राबविले जात असले तरी गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत शाळांची प्रगती समाधानकारक दिसत नाही. संशोधक स्वत: शिक्षण क्षेत्रात असल्याने तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये काम करीत असल्याने तेथील शैक्षणिक संपादन पातळी तसेच शाळांमध्ये पाठयक्रमातून व विविध उपक्रमांतून राबविलेल्या जीवनकौशल्याबाबत संशोधकाला चांगली माहिती आहे. जीवनकौशल्ये शिक्षणाचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर होतो. या सर्व गोष्टीच्या विकासात विद्यार्थ्यांचे मित्र, पालक, शिक्षक हे सर्वच हातभार लावत असतात. त्यांनी दिलेले प्रोत्साहन वा निंदा या सर्व गोष्टी कळत नकळत विद्यार्थ्यांच्या एकंदरीत व्यक्तीमत्त्वातील घटकांबरोबरच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणाऱ्या ठरतात. अथवा विपरित परिणाम करणाऱ्या ठरतात. जिल्हा परिषद शाळेतील एकंदर परिस्थिती पाहता तेथील वातावरण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर, जीवनकौशल्यांवर, कार्यात्मक मूल्य व कल्पना तसेच शैक्षणिक विकासाबरोबर विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेवरही परिणाम करत असते. विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्यांचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या शालेय दृष्टिकोनातून शैक्षणिक संपादनावर, सहशालेय उपक्रमातील सहभाग नैतिक मूल्य, व्यक्तीमत्त्वातील घटक यावर पडतो का? याचा अभ्यास होणे संशोधकाला गरजेचे वाटते.

**संशोधनाचे महत्त्व :**

१) प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच समाज व शासन यांच्यादृष्टीने महत्त्वाचा आहे.

२) शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्यांच्या सकारात्मक घटकांचा विकास कसा करावा यासाठी हे संशोधन शिक्षकांना उपयुक्त ठरु शकते.

३) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वातील घटकांचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून या संशोधनाचा शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा यांना फायदा होवू शकतो.

४) शैक्षणिक संपादन व जीवनकौशल्ये एकमेकांवर कसे प्रभावी ठरतात हे पाहण्यासाठी हे संशोधन मार्गदर्शक म्हणून उपयुक्त ठरणार आहे.

५) शासन स्तरावर विविध शैक्षणिक व सामाजिक योजनांची अंमलबजावणी विद्यार्थ्यांच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाची असते. त्यासाठी एक दिशा म्हणून हे संशोधन उपयुक्त पथदर्शी ठरणार आहे.

जीवनकौशल्ये शिक्षणातून कोणता बदल विद्यार्थ्यांच्या दृष्टिने महत्वपूर्ण ठरु शकतो याचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन महत्वपूर्ण आहे.

**समस्या विधान :**

''ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन व जीवनकौशल्ये यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास''

संशोधनाची चले :

अ) आश्रयी चल — जीवनकौशल्ये

आ) स्वाश्रयी चल — शैक्षणिक संपादन

**कार्यात्मक शब्दांच्या व्याख्या :**

**ठाणे जिल्हा :—** महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्हांयापैकी एक जिल्हा.

**जिल्हा परिषद शाळा :—** जिल्हा परिषद प्रशासनाने ग्रामीण भागातील विदयार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सोयीसाठी निर्माण केलेली शैक्षणिक संस्था.

**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा:—** जिल्हा परिषद शाळेतील ६ वी ते ८ वीचा वर्ग समाविष्ट केलेला स्तर.

**शैक्षणिक संपादन**:— नेमूण दिलेले चाचणीचे गुण अथवा शिक्षकाने दिलेले गुण किंवा दोन्ही प्रकारे मूल्यमापन होते अशा शालेय विषयातील मिळविलेले ज्ञान अथवा पूर्ण केलेली कौशल्ये म्हणजे शैक्षणिक संपादन होय. — सी.व्ही.गुड.

**जीवनकौशल्ये:—** दैनंदिन जीवनातील गरजा आणि आव्हांनाना सामोरे जाण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला क्षमता संपन्न करणाऱ्या सामाजिक, मानसिक क्षमता म्हणजेच जीवनकौशल्ये होय.

**सहसंबंध:—** विविध चलांचा एकमेकांशी असणारा परस्पर संबंध सदर संशोधनात शैक्षणिक संपादन, व्यक्तीमत्वातील घटक, जीवनकौशल्ये, मूल्यशिक्षण यांतील परस्परसंबंध.

संबधित साहित्याचा आढावा:

संशोधकाने संबधित साहित्याचा आढावा घेतला असता शैक्षणिक संपादनासंदर्भात पुढील मुद्दयावर संशोधन झालेले आढळले.

- ❖ घरगुती वातावरण
- ❖ शाळा व वर्ग वातावरण
- ❖ विदयार्थ्यांची उपस्थिती
- ❖ शाळेच्या भौतिक सुविधा व विविध योजना
- ❖ पालकांचा दृष्टिकोन
- ❖ शिक्षकांची अध्यापन पध्दती

परंतु विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सपांदनावर परिणाम करणाऱ्या जीवनकौशल्यासदंर्भात राज्यात वा देशात फारसे संशोधन झाल्याचे आढळून आले नाही. संशोधनाच्या आढाव्यातून जिल्हा परिषद शाळेमध्ये विदयार्थ्यासंदर्भात संशोधन करणे गरजेचे आहे असे संशोधकाला वाटते.

**संशोधनाची गृहीतके :**

१) विदयार्थ्यांची शैक्षणिक संपादनाची पातळी भिन्न—भिन्न असते.

२) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर जीवनकौशल्यांचा प्रभाव असतो.

**संशोधनाची उद्‌दिष्टे:**

१) ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाचा अभ्यास करणे.

२) ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्यांचा अभ्यास करणे.

३) ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन व जीवनकौशल्ये यांतील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना :**

ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या लिंगनिहाय शैक्षणिक संपादन जीवनकौशल्ये यात लक्षणीय सहसंबंध आढळत नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

अ) प्रस्तुत संशोधन ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळांपुरतेच मर्यादित आहे. ठाणे जिल्हा वगळून इतर जिल्हयांना गृहीत धरले नाही.

ब) प्रस्तुत संशोधनात फक्त ग्रामीण भागातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचाच समावेश केलेला आहे. शहरी भागातील विद्यार्थ्यांचा यात समावेश केला नाही.

क) प्रस्तुत संशोधन ठाणे जिल्ह्यातील पाच तालुक्यांतील जिल्हा परिषदेचे उच्च प्राथमिक म्हणजेच इ. सहावी ते आठवी चे वर्ग समाविष्ट असलेल्या शाळांपुरतेच मर्यादित आहे.

**संशोधन कार्यपध्दती:**

**अ) संशोधन पध्दती**

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सहसंबंध पध्दतीचा उपयोग केला आहे.

**ब) नमुना**

**विद्यार्थी**

- यांची साध्या यादृच्छिक पध्दतीने निवड करण्यात आली आहे.

**क) न्यादर्श**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचा समावेश केला आहे. ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळांतील ९२ शाळांपैकी ५० टक्के म्हणजे ४६ शाळांचा समावेश सदर संशोधनात संशोधकाने केला आहे. उच्च प्राथमिक स्तरावरील एकूण ३३४३ विदयार्थ्यांपैकी १५ टक्के म्हणजेच ५०० विद्यार्थ्यांचा समावेश संशोधनात केला आहे.

वरील जनसंख्येतील १५ टक्के विदयार्थ्यांची सुगम न्यादर्शपध्दतीने निवड करण्यात आली.

**ड) माहिती संकलनाची साधने :**

प्रस्तुत संशोधन वर्तमानकाळातील असल्यामुळे माहिती संकलनासाठी प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. यात

**प्रमाणित साधने :**

- जीवनकौशल्यावर आधारित प्रश्नावली.
- केंद्रीय प्रवृत्तीचे मापन करण्यासाठी सरासरीचा उपयोग करण्यात आला.
- विचलन मोजण्यासाठी टक्केवारीचा उपयोग करण्यात आला.

अनुमानात्मक विश्लेषण : प्रस्तुत संशोधनात परिकल्पनांचा पडताळा घेऊन अनुमानात्मक विश्लेषण करण्यासाठी संशोधकाने पुढील सांख्यिकी तंत्रे वापरली.

१) सहसंबंध गुणक २) आलेख

सदर संशोधनामध्ये विश्लेषणासाठी विद्यार्थ्यांचा लिंगनिहाय विचार करण्यात आला. संशोधकाने शैक्षणिक संपादन व जीवनकौशल्ये या दोन चलामधील गुणांचे निकष लक्षात घेतले. चलामधील आपआपसात सहसंबंध पाहण्यासाठी व माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पियरसन कोरिलेशन बायसिरियलचा वापर करण्यात आला.

**सारणी १.९**

**जीवनकौशल्ये व शैक्षणिक संपादन यांतील लिंगनिहाय सरासरी, प्रमाणविचलन व सहसंबध गुणांक —**

| लिंग | जीवनकौशल्ये | | शैक्षणिक संपादन | | नमुना | स्वाधीनता मात्रा | सहसंबध | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मध्यमान | प्रमाण विचलन | मध्यमान | प्रमाण विचलन | | | | |
| मुले | १६०.७७ | ३६.६४ | ३९.३६ | ४.०४ | ३०० | ४९८ | .२९६ | P<0.01 |
| मुली | १५५.७२ | ३७.५८ | ४०.१३ | ३.४७ | २०० | ४९८ | .३४७ | P<0.01 |
| एकूण | १५८.७५ | ३७.०६ | ३९.६७ | ३.८४ | ५०० | ४९८ | .२१४ | P<0.01 |

सारणी १.९ वरुन असे दिसून येते की, ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचेजीवनकौशल्ये व शै. संपादन यांतील मुलांमधील सहसंबंध मूल्ये .२९६ व मुलीमधील सहसंबंध .३४७ तसेच एकूण सहसंबंध मूल्ये.२१४ आहे. सारणीवरुन असे दिसून येते की, ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचेजीवनकौशल्ये व शै. संपादन यातील सहसंबंधमूल्य ०.०१ स्तरापेक्षा जास्त असल्याने ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचेजीवनकौशल्ये व शैक्षणिक संपादन यांत लक्षणीय सहसंबंध नाही ही परीकल्पना त्याज्य ठरते.

## निष्कर्ष :

१) ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे जीवनकौशल्ये व शैक्षणिक संपादन यात लक्षणीय सहसंबंध आहे.

२) जीवनकौशल्यांचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर होत असतो.

३) लिंगनिहाय शैक्षणिक संपादन आणि जीवनकौशल्ये यांतील सहसंबंध मध्यम स्वरुपाचा दिसून येतो.

## संदर्भ

१) पंडित रवी (१९६५), मानसशास्त्राचे मूलतत्त्वे, विद्या प्रकाशन नागपूर.

२) बोरुडे, देशपांडे सु.वा. (१९७२), माध्यमिक मानसशास्त्र महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळ, गो. य.राणे प्रकाशन पुणे.

३) देव अलका कमलाकर (१९९१), व्यक्तिमत्त्व विकास, स्वसंकल्पना, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

४) जीवनकौशल्ये शिक्षक मार्गदर्शिका (२०१०), म.रा.शै. स.व प्र.प. पुणे.

५) www-psychalogyjournals.com.